PAGE No.
DATE / /

## आमचा मॅक्स

घरातले कोणी बाहेरून आले की उड्या मारून आनंद व्यक्त करणारा आमचा मॅक्स. कोणी रागवले की लाडीगोडी लावणारा मॅक्स. लाडात आला की मीठ आडवी घालून बघणारा मॅक्स, ज्याच्याबद्दल घरातले बोलून बोलून थकायचे नाहीत, असा हा मॅक्स म्हणजे आमचा लॅब्राडोर कुत्रा. शेजारच्या लोकांमध्ये देखणा म्हणून लाडका असलेला आमचा मॅक्स, आज ४ वर्षे झाली, हया जगातून गेला, हयाच्यावर अजून विश्वासच बसत नाही.

कुठल्याही प्राण्याला हात न लावणारी मी, जेव्हा तो snow white labrador पिलू घरात आला आणि मी कधी त्याच्या प्रेमात पडले, तेच कळले नाही.

प्राणी पाळण्याचा पहिलाच अनुभव असल्याने त्या पिलाच्या प्रत्येक गोष्टीची आम्ही काळजी करायचो. जेवलाच नाही, जास्तच झोपला, अमुक केले, तमुक केले, अशीच सतत चर्चा करायचो, जणू काही एखादे छोटे बाळ आमच्या घरी आले होते.

जसा जसा मॅक्स मोठा व्हायला लागला, तश्या त्याच्या तक्रारी वाढायला लागल्या. चप्पल चावणे, पाईप चावून तोडणे, घरातले कपडे पळवून नेणे, असे उद्योग वाढू लागले. एके दिवशी त्याला बांधून ठेवला तर त्याने गॅसचे सिलेंडर पाडले. आमचा कुणाचाच होता तो, त्याच्या लीला पाहायला आम्हाला फार आवडायचो.

जेव्हा त्याची पूर्ण वाढ झाली, तो बराच शांत झाला, पण मुळातच खंबीर होता. माणसासारखे राग लोभ त्याला ही होते. लहान मुले अजिबात आवडायची नाहीत. डोक्याला कोणी कापड बांधलेला अजिबात चालायचा नाही. स्वतः चे जातभाई पण आवडायचे नाहीत. एखादे वेळ आवडीचे जेवण नसेल तर, कितीही भूक लागली तरी पूर्ण दिवस उपाशी राहील, पण न आवडणारे पदार्थ खायचा नाही.

बागेत साप फिरला तर ओरडून ओरडून सावध करायचा पण आपण त्याच्याजवळ जाऊ नये हे मात्र त्याला समजायचे नाही.
आमच्या मॅक्सला पाण्यात खेळायला इतके आवडायचे बागेला कोणी पाणी घालत असेल तर नुसता सैराट झाल्यासारखा पळापळ करायचा. आंघोळ हा शब्द ऐकला तरी नुसता आंघोळीसाठी अधीर व्हायचा. आमच्या बोलण्यातले बरेच शब्द कळायचे त्याला. बऱ्याच actions कळायच्या. खूप बुद्धिमान होता तो, मुळात लॅब्राडोर हुषार असतात. त्यामुळे पोलीस, त्यांच्या कामात, ह्या जातीच्या


कुत्र्यांचा उपयोग करतात.

घरातल्या लोकांमध्ये सुद्धा त्याची आवडनिवड होती. प्राण्यांना आपल्या मनातल्या भावना डोळ्यात दिसतात की काय कोण जाणे ज्याचे निर्मळ प्रेम मॅक्सला जाणवत असे, त्या व्यक्तीवर तो तितकाच प्रेम करायचा, अगदी unconditional प्रेम शिकावे तर ते ह्या प्राण्यांकडून शिकावे. कोणी रागवले तरी पायाला अंग घासून घासून जवळ घ्यायला लावणारच मॅक्स.

त्याची एक स्पेशल आवड होती, तो घरातली पायपुसणी खेळायला पळवून न्यायचा. सतत नवीन नवीन आणायला लागायची. आज ती पायपुसणी, त्याची खाण्याची, पाणी पिण्याची भांडी पाहून भडभडून येते.

छोट्याश्या आजाराने मॅक्स आम्हाला सोडून गेला, घरातील लहान बाळ देवाघरी जावे, तसे वाटले अगदी. त्याची जागा कोणीच भरून काढू शकणार नाही.





अंजली चौबळ
९८८७८९७४५२

